# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१

**ई-मेल आयडी :-** comscea.pune@maharashtra.gov.in
secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/प्रतिज्ञापत्रनमुना/ ७५६ /सन २०१४ दि. १३/११/२०१४

**वाचावे :** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१
२. शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३
३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ नियम २१(३)

**प्रस्तावना :**

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या दि.१३ ऑगस्ट २०१३ च्या (सुधारणा) अधिनियमातील कलम ७३ कब नुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्याची तरतुद आहे, आणि,

ज्याअर्थी, शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठण करण्यात आले आहे, आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब, दि.१२/९/२०१४ रोजी प्रसिध्द झालेल्या राजपत्रामध्ये दिनांक ११/९/२०१४ रोजीची महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ ची शासन अधिसुचना अधिसुचित होऊन त्या दिवसापासुन हे निवडणुक नियम अमलात आलेले आहेत, आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७३ क अ अनुसार उमेदवाराने अनर्ह नसल्याबाबत, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ नियम २१ (३) चे परंतुकान्वये, प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक केलेले आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ नियम २१(३) नुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून सदर शपथपत्राचा नमूना विनिर्दिष्ट करणे आवश्यक आहे,

त्याअर्थी, खालील प्रमाणे आदेश परित करण्यात येत आहेत,

## आदेश

सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र सहकारी संस्थाअधिनियम १९६० चे कलम ७३ कब व उक्त निवडणूक नियमातील नियम २१(३)चे परंतुकान्वये ,

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास प्राप्त अधिकारास अनुसरुन राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विहित केल्यानुसार सदर आदेशासोबतच्या परिशिष्ट ‘अ’नुसार उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत द्यावयाच्या शपथपत्राचा नमूना विनिर्दिष्ट करण्यात येत आहे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे निर्देशानुसार.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ सत्यमेव जयते

(सही) १३/११/१४

**( डॉ.ए.बी.जोगदंड )**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रति,**
संबंधीत जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)

प्रत माहितीस्तव :

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

प्रत माहितीस्तव सस्नेह रवाना :

१. मा.सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा.आयुक्त (साखर), साखर संचालनालय, साखर संकुल, पुणे
४. मा.आयुक्त (दुग्धविकास), अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी-फेस , वरळी मुंबई
५. मा.संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, नागपूर.

**परिशिष्ट "अ"**
**नामनिर्देशन पत्रासोबत उमेदवाराने दाखल करावयाचे प्रतिज्ञापत्र**
**(पहा महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ नियम २१(३))**
**(रू.१००/- चे मुद्रांकावर )**

---

मी.......................................................राहणार..................................तालुका.................जिल्हा........

व्यवसाय.................................................वय..........................आज दिनांक ..............................वार.....................रोजी

..............................................................................................या सहकारी संस्थेच्या निवडणुकीसाठी, या द्वारे प्रतिज्ञापूर्वक दृढकथन करतो की,

मी, उक्त संस्थेचा सभासद असून उक्त संस्थेसह , मी सभासद असलेल्या सर्व सहकारी संस्थांबाबत, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ कअ मधील पोटकलम चे खंड (एक) ते (नऊ) मधील तरतुदी अन्वये कोणतीही अनर्हता धारण करीत नाही.

**<u>सत्यापन</u>**

मी, वर नांव असलेला अभिसाक्षी , असे सत्यापित व घोषित करतो की, या प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझ्या माहिती प्रमाणे व श्रद्धेप्रमाणे खरा व बिनचूक आहे. यातील कोणताही भाग खोटा नाही व त्यातून कोणतीही गोष्ट दडवून ठेवलेली नाही.

दिनांक.......................................रोजी सत्यापित केले.

अभिसाक्षी